- 3 JUL 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यात ५० कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील : शिवाजी विद्यापीठात वृक्षलागवडीचा शुभारंभ

प्रतिनिधी
कोल्हापूर

पर्यावरण संतुलनासाठी राज्य शासनाने ५० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवले असून जनतेकडून वृक्षलागवड कार्यक्रमास राज्यभर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. गेल्या वर्षी २ कोटी ८२ लाख वृक्ष लागवड केली असून यंदा ४ कोटीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असले तरी प्रत्यक्षात ६ कोटी पर्यंत वृक्षलागवड होईल, असा विश्वास पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त करून वृक्षसंवर्धनासाठी अधिक झाडे लावा आणि झाडे जगवा, असे आवाहन केले.

वन विभाग, सामाजिक वनीकरण, कृषी विभाग आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने वृक्ष लागवड मोहिमेचा प्रारंभ तसेच स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त १ ते ७ जुलै या कृषी सप्ताहाचा शुभारंभही पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठ परिसरात करण्यात आला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात वृक्षलागवड मोहिमेचा शुभारंभ करताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील, सोबत महापौर हसीना फरास, जि. प. अध्यक्षा शौमिका महाडिक, कोल्हापूरचे पालक सचिव राजगोपाल देवरा, एमएमआरडीचे अतिरिक्त आयुक्त प्रविण दराडे, अविनाश सुभेदार, डॉ. अभिजीत चौधरी, डॉ. डी. टी. शिर्के, अरविंद पाटील, प्रभुनाथ शुक्ल, दीपक खाडे, डॉ. नारायण शिसोदे आदी.

यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते बकुळीचे रोप लावण्यात आले. जिल्हा परिषद अध्यक्षा शौमिका महाडिक, महापौर हसीना फरास, जिल्ह्याचे पालक सचिव राजगोपाल देवरा, एमएमआरडीचे अतिरिक्त आयुक्त प्रवीण दराडे, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, महापालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, शिवाजी विद्यापीठाचे प्रकुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, मुख्य वन संरक्षक अरविंद पाटील, उप वनसंरक्षक प्रभुनाथ शुक्ल, सामाजिक वनीकरणाचे उपसंचालक दीपक खाडे, कृषी सह संचालक डॉ. नारायण शिसोदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

वृक्षलागवड कार्यक्रमांतर्गत १ ते ७ जुलै या कालावधीत राज्यातील जनतेने वृक्ष लावून वृक्ष दिवाळी साजरी करावी, असे आवाहन करुन पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, जिल्ह्याचा विचार करता यंदा ८ लाख ७० हजाराहून अधिक झाडे लावण्याचे नियोजन असून, आतापर्यंत १४ हजार लोकांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे. शिवाजी विद्यापीठ परिसरात आज ४०० झाडे लावण्याचे नियोजन केले आहे.

याप्रसंगी राजगोपाल देवरा म्हणाले, वृक्ष लागवडीची ही मोहीम लोकसहभागातून यशस्वी करण्यासाठी जनतेने पुढाकार घेऊन वृक्षलागवड चळवळीला व्यापक स्वरुप द्यावे. जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार म्हणाले, जिल्ह्यात यंदा ३२ लाख रोपे उपलब्ध असून संस्था, संघटना, मंडळे तसेच जनतेने अधिकाधीक झाडे लावून वृक्षारोपणाची मोहीम यशस्वी करावी. मुख्य वनसंरक्षक अरविंद पाटील म्हणाले, वन विभागाच्या वतीने रोपे आपल्या दारी या उपक्रमातून १ ते ५ जुलै या काळात नोंदणी करणाऱ्यांना घरपोच रोपे देण्याचा प्रयत्न केला जात आहे. कृषी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या शेतकऱ्यांचा पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सहायक वन संरक्षक सुहास साळोखे यांनी आभार मानले.

यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर, निवासी उप जिल्हाधिकारी संजय शिंदे, प्रांताधिकारी सचिन इथापे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी रवींद्र खाडे, तहसीलदार उत्तम दिघे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. हरीष जगताप, कृषी अधिकारी सुरेश मगदूम, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बसवराज मास्तोळी, कृषी विकास अधिकारी चंद्रकांत सूर्यवंशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### शेती उत्पादन वाढविणे महत्त्वाचे

राज्यातील शेतकऱ्यांना सुखी समाधानी करण्यासाठी शासन अविरत प्रयत्न करीत आहे. शेतकऱ्यांचे शेती उत्पादन वाढविण्यासाठी आता कृषि अधिकाऱ्यांनी नोकरीकडे सेवा म्हणून न पाहता मिशन म्हणून काम करावे असे आवाहन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

3 JUL २०१७

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रंगमिश्रित सांडपाणी प्रक्रिया संशोधनासाठी दीड कोटी

## राष्ट्रीय प्रकल्पाच्या प्रमुखपदी शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. ज्योती जाधव

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या जैवतंत्रज्ञान विभागातर्फे (डीबीटी, नवी दिल्ली) रंगमिश्रित सांडपाण्यावर प्रक्रियेबाबत संशोधनासाठी सुमारे दीड कोटी रुपयांचा प्रकल्प मंजूर झाला आहे. तीन विद्यापीठांमध्ये संयुक्तरीत्या होणाऱ्या या राष्ट्रीय प्रकल्पाचे नेतृत्व शिवाजी विद्यापीठाच्या जीव-रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा. ज्योती जाधव यांच्याकडे देण्यात आले आहे. याबद्दल कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी ग्रंथ भेट देऊन त्यांचे अभिनंदन केले.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत हा प्रकल्प मंजूर करण्यात आला असून शिवाजी विद्यापीठासह इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, हैदराबाद आणि चारोतर युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, गुजरात या तीन संस्थांमध्ये या प्रकल्पाबाबत संयुक्त संशोधन होणार आहे. शिवाजी विद्यापीठामध्ये प्रा. ज्योती जाधव या प्रकल्पप्रमुख, तर प्रा. एस. पी. गोविंदवार उपप्रकल्पप्रमुख म्हणून काम पाहणार आहेत. या प्रकल्पासाठी डीबीटीकडून



कोल्हापूर : डॉ. ज्योती जाधव यांचे अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

दीड कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

या प्रकल्पाबाबत प्रकल्पप्रमुख डॉ. जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, वस्त्रोद्योगाशी संबंधित कारखान्यातून बाहेर पडणारे रंगमिश्रित सांडपाणी विनाप्रक्रिया नदीपात्रात सोडले जाते. या रंगमिश्रित सांडपाण्यातील विषारी रासायनिक प्रदूषकांमुळे अनेक प्रकारच्या रोगांना सामोरे जावे लागते. विविध ॲलर्जिक रिॲक्शन, म्युटेशन, अगदी कर्करोगही होतो. हे रंगमिश्रित सांडपाणी नदीत सोडण्यापूर्वी त्यावर प्रक्रिया करण्यासाठी सर्वच स्तरांवर शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

'बायोरिमेडिएशन' प्रक्रियेने नैसर्गिकरीत्या रंगमिश्रित सांडपाण्यावर कोणतेही रासायनिक पदार्थ न वापरता यशस्वीपणे प्रक्रिया केली जाते. ज्यांचाकडे मोठ्या संयुगाचे लहान, सध्या संयुगात रूपांतर करण्याची क्षमता आहे. रंगमिश्रित सांडपाणी या वनस्पतींमधून सोडल्याने यातील हानिकारक पदार्थ शोषून घेतात. तसेच, बायलॉजिकल ऑक्सिजन डिमांड (बीओडी), केमिकल ऑक्सिजन डिमांड (सीओडी) आणि टोटल डिझॉल्व्हल्ड सॉलिड (टीडीएस) हे मूल्यांक कमी झाल्याचे दिसून येते. रंगमिश्रित सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता वनस्पती व बॅक्टेरिया यांचा एकत्रित वापर करणे ही अत्यंत कार्यक्षम प्रक्रिया आहे, अशी माहिती डॉ. जाधव यांनी दिली.

### एमआयडीसीमध्ये प्रकल्प यशस्वीरीत्या कार्यान्वित

सध्या रंगमिश्रित सांडपाणी प्रक्रिया कागल येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) सात एकर जागेवर प्रत्यक्ष यशस्वीपणे कार्यरत आहे. कागल एमआयडीसीत ४५ एकर क्षेत्रात हाय रेट ट्रान्समिशन सिस्टीम (एचआरटीएस) तयार केली आहे. यामध्ये सलग नाला तयार करून बांधावर निलगिरी लावली आहे. निलगिरीची झाडे जास्तीत जास्त सांडपाणी शोषून घेतात. त्या सांडपाण्याबरोबर हानिकारक पदार्थदेखील शोषून घेतले जातात आणि झिरो डिस्चार्ज सिस्टीम तयार होते. प्रा. ज्योती जाधव आणि प्रा. एस. पी. गोविंदवार यांनी या संशोधनावर आधारित सुमारे १६५ शोधनिबंध विविध अंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकांतून प्रसिद्ध केले आहेत. डीबीटीच्या नवीन प्रकल्पात डीकलरायझेशन प्रक्रियेच्या जोडीला वीजनिर्मिती करण्याचे ध्येय संशोधकांनी बाळगले आहे.

डीबीटी यांच्याकडून हा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प मंजूर झाल्याबद्दल कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी प्रा. ज्योती जाधव यांचे ग्रंथ भेट देऊन अभिनंदन केले. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. भारती पाटील, डॉ. अनिल घुले, डॉ. एस. बी. सादळे उपस्थित होते.

3 JUL 2017 Times of India जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK professor to lead national-level research

Piyush.Bhusari
@timesgroup.com



**Kolhapur:** Professor Jyoti Jadhav of the department of bio-chemistry at Shivaji University, Kolhapur (SUK), will lead the national level research on coloured waste water treatment.

An official from SUK said that the research is being conducted jointly by three universities across the country.

The project, which is sponsored by the department of biotechnology, New Delhi, has been allotted financial assistance worth Rs 1.50 crore.

The project has been approved under the Swachch Bharat mission. Apart from SUK, Indian Institute of Chemical Technology from Hyderabad and Charotar University of Science and Technology of Gujarat are active participating in the research work.

Jadhav said, "The factories related to textiles are generally seen releasing untreated coloured waste water into the rivers. This kind of untreated water contains chemical pollutants, which can eventually pass on its poisonous quality into the river water. This water can be harmful not only for the aquatic animals and plants, bur for humans as well."

Such adulterated water can give rise to allergic reactions, mutations and in some cases cancer too. "So, the project focuses on the treatment of such untreated water before releasing it into fresh water."

Textile mills often use artificial colors and dyes in their products. "We have found that some of the chemicals remain even after the basic treatment. So, we will work and research on the bioremediation technique done since the last 10 years. In this technique, we treat the untreated water with the help of plants and bacteria," said Jadhav.

Aquatic plants such as Ipomoea aquatica, Ipomoea hederifolia, Salvinia molesta, and Bulimia marconi along with others have been found to absorb the harmful content in untreated water.

"The biological oxygen demand, chemical oxygen demand and total dissolved solids are some of the criteria found to be lowered after using the said plants. The plants also release some kind of nutrients in the water due to which bacterial growth of pseudomonas bacillus bacteria was witnessed, which helped in lowering the toxicity of the contaminated materials in the water," added Jadhav.

Vice-chancellor of SUK, Devanand Shinde congratulated the professor for the research work.

## ABOUT THE PROJECT

- The project focuses on lowering the toxicity in untreated water released by textile mills
- It uses aquatic plants and the bacteria to lower the toxicity
- DBT has allotted Rs 1.5 crore for the research project
- Three universities across the country are jointly working on the project

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 3 JUL 2017
लोकसत्ता

# रंगमिश्रित सांडपाण्यावर प्रक्रियेच्या संशोधनासाठी दीड कोटींचा प्रकल्प मंजूर

प्रतिनिधी, कोल्हापूर

**केंद्रीय विज्ञान** व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या जैवतंत्रज्ञान विभागातर्फे (नवी दिल्ली) रंगमिश्रित सांडपाण्यावर प्रक्रियेबाबत संशोधनासाठी सुमारे दीड कोटी रुपयांचा प्रकल्प मंजूर झाला आहे. विशेष म्हणजे तीन विद्यापीठांमध्ये संयुक्तरीत्या होणाऱ्या या राष्ट्रीय प्रकल्पाचे नेतृत्व शिवाजी विद्यापीठाच्या जीव-रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. ज्योती जाधव यांच्याकडे देण्यात आले आहे. याबद्दल कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी ग्रंथ भेट देऊन त्यांचे अभिनंदन केले.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत हा प्रकल्प मंजूर करण्यात आला असून, शिवाजी विद्यापीठासह इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, हैदराबाद आणि चारोतर युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स ॲंड टेक्नॉलॉजी, गुजरात या तीन संस्थांमध्ये या प्रकल्पाबाबत संयुक्त संशोधन होणार आहे. शिवाजी विद्यापीठामध्ये डॉ. ज्योती जाधव या प्रकल्प प्रमुख तर प्रा. एस. पी. गोविंदवार उप प्रकल्प प्रमुख काम पाहणार आहेत. या प्रकल्पासाठी डीबीटीकडून दीड कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

या प्रकल्पाबाबत प्रकल्प प्रमुख डॉ. जाधव म्हणाल्या, वस्त्रोद्योगाशी संबंधित कारखान्यातून बाहेर पडणारे रंगमिश्रित सांडपाणी विनाप्रक्रिया नदीपात्रात सोडले जाते. या रंगमिश्रित सांडपाण्यातील विषारी रासायनिक प्रदूषकांमुळे अनेक प्रकारच्या रोगांना सामोरे जावे लागते. पाण्यातील वनस्पती व जलचरांबरोबरच मानवावरही त्याचे दुष्परिणाम होतात. विविध रोग अगदी कर्करोगही होतो. हे रंगमिश्रित सांडपाणी नदीत सोडण्यापूर्वी त्यावर प्रक्रिया करण्यासाठी सर्वच स्तरांवर शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.